"नांदेड जिल्ह्यातील इंग्रजी माध्यमाच्या माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांसाठी मराठी भाषेच्या आस्वादन कौशल्य विकास कार्यक्रमाची निर्मिती व परिणामकारकता– एक अभ्यास"

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड येथील आंतरविद्याशाखीय अभ्यास

विद्याशाखे–अंतर्गत शिक्षणशास्त्र विषयात विद्यावाचस्पती पदवीच्या अंशतः

पूर्ततेसाठी सादर केलेला संशोधन आराखडा

संशोधक

हिवराळे चंद्रकांत विठ्ठलराव

एम. ए (मराठी), एम. एड., एम फिल. (शिक्षणशास्त्र)

संशोधन मार्गदर्शक

प्राचार्य, डॉ. घुले एस. व्ही.

एम. ए. (इंग्रजी, अर्थशास्त्र), एम. एड (सेट शिक्षणशास्त्र), पीएच. डी.

महात्मा गांधी (बी. एड / एम. एड.) महाविद्यालय, सिडको नविन नांदेड.

अभ्यासकेंद्र

शिक्षणशास्त्र संकुल, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

प्रस्तावना :—

भाषा शब्द 'भाष्' या धातूपासून बनला आहे. 'भाष्' हा संस्कृत भाषेतील मूळ धातू आहे. त्याचा अर्थ 'बोलणे' किंवा 'बोलण्याचा व्यवहार' करणे असा आहे. आपल्या मनातील विचार 'बोलून दाखवणे' हे भाषेचे महत्त्वाचे स्वरुप आहे. या पृथ्वीतलावर माणसांची उत्क्रांती होत असताना भाषेचाही विकास होत गेला. प्राचीन/अश्मयुगीन काळात मनुष्य गुहेत तथा जंगलात राहत असे शिकारीसाठी तो आपल्या मुखातून वेगवेगळया प्रकारचे इतर प्राण्यांसारखा ध्वनी/आवाज काढत असे, हे ध्वनी वेगवेगळ्या प्रकारचे असायचे प्रत्येक ध्वनीचा उच्चार हा वेगळा अर्थ/संदेश घेऊन निघत असतो. तसेच काही ध्वनींचे उच्चारण हे पुन्हः पुन्हः होत असे, त्यामुळे पुन्हः पुन्हः उच्चारल्या जाणाऱ्या ध्वनींना विशिष्ट अर्थ प्राप्त झाला, अशा अर्थपूर्ण ध्वनीतूनच भाषेची निर्मिती झालेली आहे. कालांतराने अश्मयुगीन काळातील मनुष्यात खूप मोठा बदल झाला आहे, अग्नीच्या शोधानंतर तो माणसांच्या समूहामध्ये/टोळीमध्ये राहू लागला इतरांशी आपल्या मनातील सुख—दुःख, अनुभव, भावना, विचारविनिमय इत्यादी इतरांसमोर भाषेच्या माध्यमातून व्यक्त करु लागला, त्यामुळे एक प्रकारचा आनंद त्याला होत असे. म्हणूनच मनुष्य हा समुहात राहणारा समाजशील प्राणी आहे. तो पृथ्वीतलावरील इतर प्राण्यापेक्षा सर्वश्रेष्ठ बुध्दीवान प्राणी आहे, तो समाजात राहून भाषेच्या आधारावर आपले स्वतःचे भावना, अनुभव, विचार विनिमय इत्यादी बोलण्याच्या माध्यमातून इतरांशी व्यक्त करत असतो. भारत देश हा विविधतेने नटलेला देश आहे, या देशात विविध जाती धर्मातील, समाजातील लोक राहतात, प्रत्येकांची संस्कृती, बोलीभाषा, राहणीमान, पोषाख, व्यवसाय, सन उत्सव, हे वेगवेगळे आहेत. मनुष्य हा आपल्या धर्माच्या संस्कृती बरोबर दुसऱ्या धर्माच्या संस्कृतीचा आदर करीत असतो तो इतरांच्या सन उत्सवात सहभागी होत असतो, म्हणूनच विविधतेत एकता निर्माण करण्याचे काम हे भाषा करत असते. व तसेच मनुष्याला समाजात वावरताना प्रत्येकाला दैनंदिन व्यवहार सुरळीतपणे पार पाडण्याची एखाद्या माध्यमाची गरज पडते. ते माध्यम म्हणजे भाषा होय.

इ. स. ७ व्या शतकापासून मराठी भाषेची जडण—घडण चालू होती. मराठी भाषा लोकव्यवहारात होती. प्रारंभीचे सर्व ग्रंथ (ज्ञानेश्वरी, विवेकसिंधू) हे पद्यात होते. परंतु महानुभवीय वांङ्मय 'लीळाचरित्र' हा ग्रंथ मात्र गद्याच्या स्वरुपात होता. म्हणूनच मराठीला आलेला बहर हा लीळाचरित्राच्या माध्यमातून दिसून येतो. संस्कृत भाषा ही मराठीची जननी होय. मराठी भाषेतील पहिला शिलालेख हा कर्नाटकातील श्रवणबेळगोळ येथील

श्रीगोमटेश्वराच्या मूर्तीखाली आढळतो. 'श्री चावुण्डरायें करवियलें' ही शिलालेखातील ओळ म्हणजे मराठीतील पहिले वाक्य होय. म्हणून कालांतराने हळूहळू मनुष्याबरोबर भाषेचीसुध्दा प्रगती होत गेली.

भाषाः– व्याख्या व अर्थ

1. **ब्लॉक व ट्रॅगर** :– "भाषा ही ध्वनियुक्त चिन्हांची अशी स्वैच्छिक पध्दती आहे की जिच्यामदतीने सामाजिक गट संप्रेषण व एकमेकांशी सहकार्य करू शकतो." नित्यनुतन नोव्हेंबर 2007 प्रकाशन, मराठीचे आशययुक्त अध्यापन, डॉ. अरविंद दुनाखे
2. **सेपिर** :– "स्वतःचे विचार, भाव तसेच इच्छा, कल्पनेद्वारे निर्मित ध्वनिचिन्हांच्या माध्यमाने संप्रेषित करण्यासाठी पूर्णपणे मानवाने प्रयत्नपूर्वक निर्माण केलेली, उपजत नसलेली पध्दती म्हणजे भाषा होय." नित्यनुतन नोव्हेंबर 2007 प्रकाशन, मराठीचे आशययुक्त अध्यापन, डॉ. अरविंद दुनाखे
3. **काचे** :– "भाषा अभिव्यक्तीच्या दृष्टीने उच्चारण व ठरावीक ध्वनींचे संघटन होय." निराली प्रकाशन, मराठी प्रथम भाषा, एप्रिल 2008, डॉ. नलिनी भरत पिचड, डॉ. रामदास हरीभाऊ बरकले, डॉ. शीला भरतकुमार कोलटकर
4. **स्वीटः**–"ध्वनीमय शब्दांद्वारा विचारांचे प्रकटीकरण म्हणजेच भाषा होय." निराली प्रकाशन, मराठी प्रथम भाषा, एप्रिल 2008, डॉ. नलिनी भरत पिचड, डॉ. रामदास हरीभाऊ बरकले, डॉ. शीला भरतकुमार कोलटकर

भाषेचे दैनंदिन जीवनातील स्थान व महत्त्वः–

भाषा हे दैनंदिन जीवनातील व्यवहार सुरळीत चालण्यासाठी संवादाचे प्रभावी साधन आहे. यामध्ये बोलणारा आणि ऐकणारा हे दोन घटक महत्त्वाचे असतात, या दोघांना जोडण्याचे काम भाषा करत असते. विविध इलेक्ट्रॉनिक्स् च्या उपकरणातून ज्ञान व मनोरंजन प्राप्तीचे साधन म्हणून भाषेकडे पाहिले जाते. त्यातून व्यक्तीचा विकास व त्याच्या सृजन शक्तीचा विकास होत असतो. आपले विचार, भावना, कल्पना, अर्थच्छटा नेमकेपणाने व्यक्त/प्रकट करण्यासाठी भाषेवरील प्रभुत्व आवश्यक असते. भाषा हे माणसाला आयुष्यभर त्याच्या विकासासाठी मदत करत असते. व्यक्तीविकासाबरोबरच समाजाचाही विकास भाषा करत असते. समाजात विविध जाती, धर्माचे, पंथाचे, विविध स्तरातील लोक राहत असतात, प्रत्येकाची संस्कृती ही वेगवेगळी आहे. प्रत्येकाची बोली वेगवेगळी आहे, त्या वेगवेगळ्या

संस्कृतीतून त्यांच्या भाषेचे दर्शन होत असते. एकंदरीत भाषेच्या माध्यमातून संस्कृती विकसित होत असते. भाषेमुळे त्यांच्या संस्कृतीची ओळख होते, संस्कृतीचे संवर्धन तथा जतन होते व सामाजिक ऐक्यास सहाय्यक म्हणून भाषा ही खूप महत्त्वाची असते. समाजाच्या विकासासाठी समाजातील अनेक विचारवंत, तत्त्वज्ञ, कवी, लेखक या सर्वांचा सहभाग असतो. त्यांच्या विचारांचे जतन करण्याचे काम भाषा करत असते. आपल्या या विविधतेने नटलेल्या भारत देशात वेगवेगळया भौगोलिक प्रांतरचनेनुसार, वेगवेगळया सामाजिक लोकजीवन तथा संस्कृतीनुसार वेगवेगळया प्रकारच्या भाषा बोलल्या जातात. प्रत्येक भाषेचे वेगवेगळे प्रकार आहेत. त्यात 1. अभिजात भाषा 2. प्राचीन भाषा 3. मातृभाषा 4. द्वितीय भाषा 5. तृतीय भाषा 6. परकीय भाषा 7. व्यक्तीभाषा अथवा व्यक्तीबोली 8. समाज भाषा 9. बोलीभाषा 10 प्रमाणित भाषा 11. क्षेत्रिय भाषा 12. राष्ट्रभाषा 13. राजभाषा 14. आंतरराष्ट्रीय भाषा 15. जागतिक भाषा 16. संपर्क भाषा इत्यादी.

मातृभाषा/मायबोली मराठीः—

मनुष्य हा जन्माला आल्यानंतर सुरुवातीला आपल्या कुटूंबात राहतो. कुटूंबात त्याला सर्वप्रथम त्याची जन्म देणारी आई आपल्या मायबोली भाषेत बोलत असते, ज्यावेळेस ते बाळ रडत असते त्यावेळेस त्याला शांत करण्यासाठी वेगवेगळया प्रकारचे अंगाई गीत/गाणे ती म्हणत असते. ते बाळ जस जसे मोठे होत जाईल तस तसे आईचे प्रत्येक शब्द त्याच्या कानावर पडत असतात. त्यातून ते बाळ वेगवेगळया ध्वनींच्या माध्यमातून बोलण्याचा/ध्वनीसंकेत उच्चारणाचा प्रयत्न करत असते. आईच्या सहवासातून, तिच्या शब्दोच्चारातून, तिने दिलेल्या संस्कारातून त्या बाळाची/मूलाची जडण—घडण होते व तसेच कुटूंबातील इतर सदस्यांचे जसे वडील, आजी, आजोबा, काका, काकी, मोठे भाऊ, बहीण, कुटूंबाबाहेरील शेजारी इत्यादींचे बोलणे सुध्दा त्याच्या कानावर पडत असतात. त्यातून तो आपली मायबोली विकसित करत असतो. म्हणूनचा एका अर्थाने मातृभाषा आणि बालपण यांचे नाते खूप महत्त्वपूर्ण आहे.

भाषातज्ज्ञ **श्री. ग. वि. अकोलकरांनी** मातृभाषेची अतिशय सुंदर व्याख्या केली आहे ते म्हणतात—

1. 'व्यक्तित्त्वाच्या वेलीवर उमलणाऱ्या सुंदर सुमनांचा मातृभाषा हाच जीवनरस आहे.'

2. 'जी भाषा बालक सर्वप्रथम आपल्या आईकडून शिकते, जिच्याद्वारे ते आपले घर व समाजात आपल्या विचारांची अभिव्यक्ती करते, खऱ्या अर्थाने तीच भाषा त्या बालकाची मातृभाषा असते.' निराली प्रकाशन, मराठी प्रथम भाषा, एप्रिल 2008, डॉ. नलिनी भरत पिचड, डॉ. रामदास हरीभाऊ बरकले, डॉ. शीला भरतकुमार कोलटकर

महाराष्ट्रात मराठी या मातृभाषेचा वारसा आपल्याला लाभलेला आहे. मराठी ही एक महाराष्ट्रात सर्वदूर बोलली जाणारी भाषा आहे. संपूर्ण महाराष्ट्रात विचारांचे आदान–प्रदान करण्यासाठी मराठी भाषेचा वापर केला जातो. महाराष्ट्रातील हजारो खेडयांमधून, वाडी, तांडा वस्त्यांमधून व शहरांमधून मराठी भाषा बोलली जाते. या महाराष्ट्राची आणि मराठीची परंपरा समृध्द आहे. अनेक शेतकरी, कामगार, लहान, मोठे व्यावसायिक यांनी ही परंपरा समृध्द केली आहे. अशा या आपल्या मराठी मातृभाषेचे वैभव आपल्यापर्यंत पोहचले आहे. म्हणून मराठी भाषेबद्दल काही विचारवंत, लेखक, कवींनी आपले मत व्यक्त केले आहेत–

1. लाभले आम्हांस भाग्य बोलतो मराठी
   जाहलो खरेच धन्य ऐकतो मराठी
   धर्म, पंथ, जात एक जाणतो मराठी
   एवढया जगात माय मानतो मराठी

   – सुरेश भट

2. परभाषेतही व्हा पारंगत
   ज्ञानसाधना करा, तरी ।
   माय मराठी मरते इकडे परकीचे
   पद चेपू नका ।।
   भाषा मरता देशही मरतो
   संस्कृतिचाही दिवा विझे ।
   गुलाम भाषिक होऊनि
   अपुल्या प्रगतीचे शिर कापु नका।।

   – कुसुमाग्रज

मराठी भाषेचे अभ्यासक्रमातील स्थान व महत्त्वः—

शिक्षणाची राष्ट्रीय तथा शालेय अभ्यासक्रमाची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी शासनाने शिक्षण क्षेत्रात त्रिभाषा सूत्राचा अवलंब केलेले आहे. हे त्रिभाषा सूत्र म्हणजे मातृभाषा/प्रादेशिकभाषा, राष्ट्रीयभाषा आणि आंतरराष्ट्रीय भाषा जसे— महाराष्ट्रातील मराठी माध्यमाच्या शाळेतील वापरात येणारा भाषिकस्तर प्रथम भाषा मराठी, द्वितीय हिंदी आणि तृतीय भाषा इंग्रजी असा होय. या त्रिभाषा सूत्राद्वारे अभ्यासक्रमाची उद्दिष्टे साध्य करता येतात. तर इंग्रजी माध्यमाच्या शाळेतील भाषिक स्तर प्रथम भाषा इंग्रजी द्वितीय भाषा मराठी व तृतीय भाषा हिंदी असा स्तर आहे. महाराष्ट्र राज्यात मराठी माध्यमाच्या शाळेतील विद्यार्थ्यांसाठी मराठी भाषेतून व इंग्रजी माध्यमाच्या शाळेतील विद्यार्थ्यांसाठी इंग्रजी भाषेतून अभ्यासक्रमाची रचना केलेली आहे. अभ्यासक्रमाची रचना ही विद्यार्थ्यांचे वय, स्तर, बौध्दीक काठीण्य पातळी इत्यादी गोष्टींचा विचार करुन केला जातो. महाराष्ट्रातील बहुतांश विद्यार्थी हे ग्रामीण भागातील आदिवाशी, दुर्गम, डोंगराळ, वाडी, वस्तीतील असतात. त्यांना पुरेशा प्रमाणात शैक्षणिक सुविधा उपलब्ध नसतात, व तसेच घरात दारिद्र्य, पालकांचे अज्ञान तथा अशिक्षित पालक, सामाजिक, व आर्थिक प्रगतीत मागासलेपण या सर्व घटकांचा प्रभाव त्या बालकांच्या शिक्षणावर होत असतो. शिक्षणाच्या सार्वत्रिकरणामुळे प्रत्येक बालकाला मोफत व सक्तीचे शिक्षण घेण्याचा अधिकार प्राप्त झालेला आहे. शिक्षणाच्या समान संधीमुळे खाजगी शाळेमध्येसुध्दा बालकाला शिक्षण घेण्याचा अधिकार आहे.

लहान मूल ज्यावेळेस आपल्या कुटूंबात आईच्या मुखातून निघालेले शब्द, ध्वनी, भाषा ग्रहण किंवा आत्मसात करतो, तिच भाषा तो समाजात तथा शाळेत बोलत असतो. शालेय स्तरावर मराठी माध्यमाच्या शाळेतील विद्यार्थी इयत्ता पहिली पासून ते महाविद्यालयीन स्तरापर्यंत तो सर्व विषयाचा अभ्यास मातृभाषेतून करत असतो. कारण त्याला मातृभाषा लहानपणापासून अवगत झालेली असते. इतर भाषेच्या तुलनेत त्या बालकाला मातृभाषा/मराठी भाषा समजण्यास अधिक सुलभ व सोपी वाटते म्हणून तो अपेक्षित ध्येयापर्यंत पोहचू शकतो. इंग्रजी माध्यमाच्या शाळेतील विद्यार्थ्यांना मराठी भाषेचा पाया पक्का नसल्यामुळे तो अपेक्षित ध्येयापर्यंत पोहचू शकत नाही. एकंदरीत अभ्यासात तो खूप मागे असतो. म्हणून शिक्षणाची, अभ्यासक्रमाची, अपेक्षित उद्दिष्टे साध्य होत नाहीत. शिक्षणाची तथा अभ्यासक्रमाची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी शाळेमध्ये अध्ययन—अध्यापन प्रक्रिया खूप महत्त्वाची असते, अध्ययन—अध्यापन प्रक्रिया ही मातृभाषेतून होत असते. म्हणून मातृभाषा हे

अध्ययन–अध्यापनाचे प्रभावी माध्यम आहे. सामाजिक व सांस्कृतिक वारसाचे धडे, मराठी साहित्याची आवड निर्माण करण्याचे साधन, विचार, भावना व अनुभव इत्यादींचा अभ्यास शालेय स्तरावर मातृभाषेतून करता येतो. नागरीकत्वाचा विकास, तसेच इतर विषयांशी सहसंबंधाचा अभ्यासही मातृभाषेतून करता येतो.

मातृभाषेविषयी विचारवंतांची मते–

1. **महात्मा गांधीः–** "मानवाच्या विकासासाठी आईच्या दुधाइतकीच मातृभाषाही महत्त्वाची आहे."
2. **रविंद्रनाथ टागोरः–** "इंग्रजी भाषेच्या पदराआड लपलेली विद्या आमची अनुगामिनी होणार नाही, त्यामुळे इंग्रजी माध्यमातून शिकणाऱ्या बहुतांशी लोकांना शिक्षण मिळते पण विद्या मिळत नाही."
3. **जॉर्ज सॅमसनः–** 'मातृभाषेतून शिक्षण केवळ ज्ञानप्राप्तीचे साधन नव्हे तर ते बालकाला जीवनाची दिक्षा देणारे प्रमुख साधन आहे.' निराली प्रकाशन, मराठी प्रथम भाषा, एप्रिल 2008, डॉ. नलिनी भरत पिचड, डॉ. रामदास हरीभाऊ बरकले, डॉ. शीला भरतकुमार कोलटकर

वरील विविध विचारवंतांच्या विचारातून असे दिसून येते की, व्यक्तीच्या सर्वांगीण विकासासाठी व विशिष्ट अशा निश्चित ध्येयापर्यंत जाण्यासाठी शालेय स्तरावर मातृभाषेचे खूप महत्त्वाचे आहे.

आस्वाद :–

आस्वाद हा शब्द पाकशास्त्रातून आलेला आहे. संस्कृत भाषेमध्ये त्याचा अर्थ चव घेणे, किंवा खाऊन पाहणे असा आहे. इंग्रजीमध्ये आस्वादाला **(Taste)** असे म्हणतात. म्हणजेच आस्वादाला पाकशास्त्रात एखाद्या पदार्थाची चव कशी झालेली आहे, हे पाहणे होय. तो चांगला झाला आहे की नाही याची पारख आस्वादातून लक्षात येते. सामान्यतः आस्वाद हा शब्द एखाद्या गोष्टीमुळे होणारा आनंद, सुख, समाधान वगैरे दर्शवितो. भाषाशास्त्रात आस्वाद ही संकल्पना पाकशास्त्रातून आलेली आहे.

मराठी भाषेची आस्वादप्रक्रिया :—

संपूर्ण जगात 3000 च्या आसपास भाषा बोलल्या जातात. संपूर्ण जगाात भाषांची संख्या जरी खूप असली तरी प्रत्येकाची मातृभाषा एकच असते. जन्माला आलेल्या बालकाशी त्याची आई ज्या भाषेत बोलते ती त्या बालकाची मातृभाषा असते. आई आपल्या बाळाला एकेक शब्द बोलायला शिकविते. सुरुवातीला बाळ फक्त ऐकत असतो. नंतर त्याच्यात शारीरिक वाढ व मानसिक विकास झाल्यावर ते ऐकलेले शब्द बोलण्याचा प्रयत्न करतो. म्हणूनच भाषाविकासाचे पहिले कौशल्य हे श्रवण होय. श्रवण कौशल्यानंतर बालक बोलायला, लिहायला आणि वाचायला शिकत असतो. हे चार भाषिक कौशल्य आत्मसात केल्यावर व्यक्ती जगातील कोणत्याही भाषेवर प्रभुत्व मिळवू शकतो.

कोणत्याही भाषेचा आस्वाद घ्यायचा असेल तर भाषेचे चार कौशल्य आत्मसात करावे लागतात. त्याचबरोबर प्रत्येक कौशल्यावर अभिरुची/आवड निर्माण करावे लागते. ही अभिरुची गरजेतून निर्माण होत असते. शालेय स्तरावर लहान मुलांना या भाषिक कौशल्याचा विकास करायचा असेल तर इयत्ता पहिलीपासून ते महाविद्यालयीन स्तरापर्यंत त्या विद्यार्थ्यांना सुरुवातीला सोपी, परिचित व आवडीची बडबड गीते, कविता, गोष्टी/कथा व तसेच परिचित प्रसंगातील संभाषण व समजून ऐकवणे, मुळाक्षरे, बाराखडी व त्यापासून छोटी छोटी अर्थपूर्ण शब्द, वाक्ये, याचे वाचन करता येणे कविता चालीवर म्हणणे, वर्गात विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे देणे, सहशालेय उपक्रमात जसे वादविवाद व वक्तृत्त्व अशा उपक्रमात सहभागी होणे व तसेच अनुलेखन, श्रुतलेखन आणि गतिलेखन इत्यादी लेखनातील कौशल्य विकसित करणे वरील चार भाषिक कौशल्यांचा विकास शालेय स्तरातच होत असतो. व तसेच मराठी भाषेतील विविध लेखकांचे वेगवेगळ्या साहित्य प्रकाराचा अभ्यास करणे महत्त्वाचे ठरते, म्हणून अशा विविध कौशल्यावर आधारीत त्या विद्यार्थ्याला मराठी भाषेबद्दल आवड निर्माण होते, आवड निर्माण झाल्यानंतर त्या भाषेचा आस्वाद घेता येतो.

आस्वादप्रक्रियेत आस्वादक हा महत्त्वाचा घटक आहे. म्हणून अ. वा. कुलकर्णी यांनी आस्वादकामध्ये 1. मानसिक स्वास्थ्य, 2. सौंदर्यदृष्टी, 3. रसिकता, 4. संवेदनक्षमता, 5. कलाशास्त्राचे अध्ययन, 6. जिज्ञासा, 7. मनाची निर्मलता, 8. कलाकृतीशी तद्रुप होण्याची क्षमता, 9. भाषेचे ज्ञान, 10. कलात्मक अलिप्तता, 11. प्रतिभा इ. गुणधर्म असणे आवश्यक

आहे असे सांगितलेले आहेत. व तसेच अभिरुची, सर्जनशीलता, रसग्रहणक्षमता, समीक्षकवृत्ती, विश्लेषणात्मकवृत्ती, भाषेचा अन्वयार्थ लावण्याची क्षमता. इत्यादी घटक आस्वादकामध्ये असणे आवश्यक आहे.

इंग्रजी माध्यमाच्या शाळेतील विद्यार्थ्यांमध्ये मराठी भाषेतील श्रवण, वाचन, भाषण आणि लेखन या भाषिक कौशल्यांचा अधिक प्रमाणात विकास झालेला नसतो. म्हणून मराठी मराठी भाषेच्या आभ्यासात ते मागे असतात. एकंदरीत त्यांचा भाषेतील आस्वादन कौशल्याचा विकास झालेला दिसून येत नाही. म्हणून संशोधकाने नांदेड जिल्ह्यातील इंग्रजी माध्यमाच्या माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांमध्ये मराठी भाषेतील आस्वादन कौशल्य विकसित करण्यासाठी श्रवण, वाचन, भाषण आणि लेखन या भाषिक कौशल्या आधारे कार्यक्रमाची निर्मिती करुन त्याची परिणामकारकता अभ्यासण्यासाठी संशोधकाने सदर संशोधन विषयाची निवड केलेली आहे.

1.1 संशोधनाची गरज :–

आजचे युग हे 21 व्या शतकातले आहे. आज तंत्रज्ञानामुळे प्रत्येक क्षेत्रात झपाट्याने विकास होत आहे. माहिती व तंत्रज्ञानामुळे ज्ञानाचा प्रस्फोट झालेला आहे. क्षणार्धात इंटरनेटच्या माध्यमातून जगातील कानाकोपऱ्याची माहिती मिळत आहे. आज माहिती व तंत्रज्ञानाचा विकास शिक्षणातून झालेला आहे. शिक्षणाशिवाय जगातील कुठल्याही घटकात बदल/प्रगती होत नाही. म्हणून आज शिक्षणाशिवाय पर्याय नाही.

आजचा विद्यार्थी हा या देशाचा भावी नागरीक होणार आहे, त्यामुळे आज शालेय स्तरावर बालकाचा (शारीरिक, मानसिक, भावनिक,) असा सर्वांगीण विकास होणे गरजेचे आहे, शाळेतील विविध विषयाच्या अभ्यासातून व अभ्यासेत्तर विविध उपक्रमातूनच बालकाचा सर्वांगीण विकास होत असतो, म्हणून शाळेमध्ये सर्वच विषयाचे ज्ञान देणे गरजेचे आहे.

भारत देश हा विविधतेने नटलेला देश आहे. या देशात विविध जाती धर्मातील लोक राहतात. प्रत्येक जाती धर्माची संस्कृती ही वेगवेगळी आहे. प्रत्येकाची बोलीभाषा, व्यवसाय, राहणीमान, पोषाख, सामाजिक स्तर हा वेगवेगळा आहे. म्हणून या देशातील प्रत्येकाच्या संस्कृतीचे दर्शन हे शालेय स्तरावरील विविध विषयाच्या अभ्यासातून होत असतो.

शालेय स्तरावर इतर विषयाच्या अभ्यासाबरोबर मराठी भाषा हा विषयसुध्दा अभ्यासणे खूप गरजेचे आहे. मराठी या विषयातील विविध साहित्य प्रकाराच्या (नाटक, कविता, कथा,

कादंबरी, चरित्रे, निबंध) इत्यादींच्या अभ्यासामुळे संपूर्ण महाराष्ट्रातील विविध प्रकारच्या जाती–धर्मातील लोकांची संस्कृती अभ्यासता येते. मराठी भाषेच्या विविध साहित्यप्रकारात लेखकांनी आपल्या साहित्य कलेच्या जोरावर स्वतःच्या आयुष्यातील/भावविश्वातील सुःख –दुःख, कटूसत्य, सौंदर्यता, तत्त्कालीन जीवनपध्दतीचे वास्तव चित्रण मांडले गेले आहेत. म्हणून मराठी भाषेचा आस्वाद अभ्यासणे खूप गरजेचे आहे. प्रत्येक भाषेला नियम व वळण लावण्यासाठी त्याची रचना तयार केलेली असते, त्यालाच भाषेचे व्याकरण असे म्हणतात. मराठी भाषेचे व्याकरणाचा अभ्यास व तसेच वेगवेगळे लेखन प्रकार जसे निबंधलेखन, बातमीलेखन, वृतान्तलेखन, आत्मकथन, कथालेखन इत्यादींचा अभ्यास करण्यासाठी मराठी भाषेचे आस्वादन घेण्यासाठी कार्यक्रमाची निर्मिती करणे संशोधकाला खूप गरजेचे वाटते.

आज भारतातील बहुतांश राज्यात इंग्रजी माध्यमाच्या शाळेत खूप वाढ झालेली आहे. म्हणून प्रादेशिक भाषेला दुय्यम स्थान दिले गेले आहे. त्यात महाराष्ट्रातही इंग्रजी माध्यमांच्या शाळेत प्रादेशिक भाषा मराठी या विषयाला दुय्यम स्थान दिले गेले आहे. त्यामुळे इंग्रजी माध्यमाच्या शाळेतील विद्यार्थी हे मराठी माध्यमाच्या शाळेतील विद्यार्थ्यांपेक्षा मराठी या विषयाच्या अभ्यासात खूप मागे आहेत. अजूनही इंग्रजी माध्यमाच्या शाळेतील विद्यार्थ्यांमध्ये श्रवण, वाचन, भाषण, लेखन ही भाषिक कौशल्ये विकसित झालेली नाहीत, त्यामुळे त्यांच्यात मराठी भाषेचे आस्वादन कौशल्याचा विकास झालेला नाही.

म्हणून प्रस्तुत संशोधन विषयाच्या अभ्यासात संशोधकाने नांदेड जिल्ह्यातील इंग्रजी माध्यमाच्या माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांसाठी मराठी साहित्य आस्वादन कौशल्य विकासाच्या कार्यक्रमाची निर्मिती करणे व त्याची परिणामकारकता अभ्यासण्यासाठी संशोधकाला सदर संशोधन विषयाचा अभ्यास करण्याची गरज निर्माण झाली आहे.

1.2 संशोधनाचे महत्त्व :–

आज इंग्रजी माध्यमाच्या शाळेतील विद्यार्थी हा मराठी विषयामध्ये ज्ञानार्थी नसून तो फक्त परीक्षार्थी बनलेला आहे, म्हणून तो इतर विषयापेक्षा मराठी या विषयामध्ये खूप मागे आहे, त्यांच्यात प्रगती होणे खूप गरजेचे आहे. इंग्रजी माध्यमाच्या शाळेतील विद्यार्थ्यांमध्ये जर प्रादेशिक भाषा मराठी या विषयाच्या अध्ययन–अध्यापनात बदल करणे खूप महत्त्वाचे आहे. अध्ययन–अध्यापन ही प्रक्रिया हे अभ्यासक्रमाची उदिद्ष्टे साध्य करण्याचे खूप मोठे साधन आहे. अध्ययन–अध्यापनात विविध अध्यापन पध्दती, अध्यापनाची सूत्रे, यांचा अध्यापनात वापर करुन अध्यापनात नाविन्यता आणणे, अध्ययन–अध्यापनाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये श्रवण, वाचन, भाषण, लेखन, ही भाषिक कौशल्ये आत्मसात करुन भाषिक ज्ञान अधिक वृध्दींगत करता येते, त्याचबरोबर वेगवेगळे अभ्यासपूरक सहशालेय उपक्रमातूनसुध्दा मराठी भाषेचे ज्ञान अधिक प्रमाणात घेता येते. भाषा प्रयोगशाळेतून विद्यार्थ्यांमध्ये शब्दभांडाराची ज्ञानवृध्दी करता येते व तसेच मराठी भाषेच्या व्याकरणातून मराठी भाषा बोलण्याचे व लिहिण्याचे नियम अभ्यासता येत असतात.

मातृभाषेबद्दल आवड निर्माण करण्याचे सर्वात उत्तम साधन म्हणजे श्रवण, वाचन, लेखन, आणि भाषण हे भाषिक कौशल्य होय. लहानपणापासूनच कुटूंबात वावरत असताना बालकामध्ये श्रवण, भाषण या भाषिक कौशल्याच्या माध्यमातून गोष्ट, गाणे ऐकण्याची व म्हणण्याची, नाट्यात्मकरीत्या बोलण्याची आवड निर्माण झालेली असते. बालकांत शालेय स्तरावर अक्षरओळख झाल्यानंतर अर्थपूर्ण छोटे–छोटे शब्दांचे वाचन व अर्थपूर्ण वाक्यरचनेचे वाचन करण्याचे ज्ञान आत्मसात केलेल्यानंतर मातृभाषेतील वेगवेगळी पुस्तके बालक सहज वाचू शकतो. म्हणून मराठी या मातृभाषेच्या आवडीमुळे व्यक्तीचे जीवन समृध्द होते. तिचा जीवनातील सर्व क्षेत्रांतील अनुभवांशी परिचय होतो. व्यक्ती बहुश्रुत होते. तिच्या अभिव्यक्तीवर चांगला परिणाम होतो व मराठी भाषेचा दुसऱ्यावर प्रभाव पाडण्यास मदत होते. सामाजिक व्यवहारात व्यक्तिला आत्मविश्वासाने वागण्याची शक्ती भाषेच्या अभ्यासामुळे प्राप्त होते व ती सुसंस्कृत बनते म्हणून विद्यार्थ्यांमध्ये मराठी भाषेचे आस्वादन कौशल्य विकास कार्यक्रमाची निर्मिती करणे व त्याची परिणामकारकता अभ्यासण्यासाठी संशोधकाला सदर संशोधन विषयाचा अभ्यास करणे महत्त्वाचा वाटतो .

मराठी भाषेचा आस्वाद घेण्याची म्हणजेच भाषेच्या रसास्वादाची किंवा सौंदर्यानुभूतीची पात्रता विद्यार्थ्यांमध्ये केंव्हा निर्माण होईल जेंव्हा त्यांच्यात अभिरुची, सृजनशक्ती,

कल्पनाशक्तीचा व विचारशक्तीचा विकास झाला असेल किंवा भावना सुसंस्कारित होऊन भावानुभूतीची क्षमता विकसित झाली असेल तर. एवढेच नव्हे तर संवेदनक्षमता, सौंदर्यदृष्टी, सह्रदयता, सदभिरुची, रसिकता, या मनःप्रवृत्तींचा व शक्तींचा जर योग्य विकास झाला असेल तरच. म्हणून भाषा शिक्षकाने आपल्या अध्यापनातून विद्यार्थ्यांना मराठी या मातृभाषेचा विविधांगी दृष्टीकोनातून विकास केला पाहिजे.

संशोधकाला सदर संशोधनात इंग्रजी माध्यमाच्या शाळेतील विद्यार्थ्यांना मराठी भाषेचे अस्वादन कौशल्य विकास कार्यक्रमाची निर्मिती करुन त्याची परिणामकारकता काय आहे व त्यावर उपाययोजना काय सुचवता येतील याचा अभ्यास करण्यासाठी सदर संशोधन विषय संशोधकाला महत्त्वाचा वाटतो.

1.3 संशोधन समस्या विधान :–

"नांदेड जिल्ह्यातील इंग्रजी माध्यमाच्या माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांसाठी मराठी भाषेच्या आस्वादन कौशल्य विकास कार्यक्रमाची निर्मिती व परिणामकारकता– एक अभ्यास"

1.4 कार्यात्मक व्याख्या :–

1.4.1 नांदेड जिल्हा

गोदावरी नदीच्या काठी वसलेले मराठवाडयातील नांदेड हे जिल्ह्याचे ठिकाण आहे. येथे शिखांचे दहावे गुरू गुरू गोविंदसिंघ यांची समाधी आहे. व तसेच नांदेड येथे दूरदर्शन प्रक्षेपण केंद्र व आकाशवाणी केंद्र आहे, नांदेड जिल्ह्यात एकूण सोळा तालुके आहेत. माहूर येथे रेणूका मातेचे मंदिर आहे, देगलूर तालुक्यात होट्टल येथे हेमाडपंथी मंदिर आहे.

1.4.2 इंग्रजी माध्यम

मानवी विचारांची देवाण–घेवाण करण्यासाठी जगातील विविध प्रमुख भाषांपैकी इंग्रजी हे भाषेचे माध्यम आहे.

1.4.3 माध्यमिक स्तर

"राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 नुसार ठरवलेले शैक्षणिक स्तर 5+3+3+4 मधील 5+3+3+4 हा माध्यमिक स्तर होय." व

“राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 1986 नुसार ठरवलेले शैक्षणिक स्तर 10+2+3 मधील इयत्ता 10 वी पर्यंतचा माध्यमिक स्तर होय.”

1.4.4 मराठी

मराठी हे महाराष्ट्रातील प्रादेशिक भाषेला दिलेले नाव आहे.

1.4.5 भाषा

1. **ब्लॉक व ट्रॅगर** :— “भाषा ही ध्वनियुक्त चिन्हांची अशी स्वैच्छिक पध्दती आहे की जिच्या मदतीने सामाजिक गट संप्रेषण व एकमेकांशी सहकार्य करू शकतो.” नित्यनुतन नोव्हेंबर 2007 प्रकाशन, मराठीचे आशययुक्त अध्यापन, डॉ. अरविंद दुनाखे

2 **सुकूमार सेन** :— “कंठाद्वारे निघालेला सार्थ ध्वनी सुच्चय म्हणजे भाषा होय.”

1.4.6 आस्वादन प्रकिया

भरतमुनीः— “आस्वादयन्ति सुमनस् प्रेक्षकाः” अशी व्याख्या केली आहे.

“साहित्यकृतीतील नेमक्या सौंदर्याची सहानुभूतीपूर्वक घेतलेली दखल आणि त्याद्वारा केलेले योग्य मूल्यमापन म्हणजे आस्वाद होय”.

1.4.7 कौशल्य

“कौशल्य म्हणजे निर्धारित परिणामांसह वेळ आणि ऊर्जा या दोन्हींच्या प्रमाणात किया करण्याची क्षमता होय.”

1.4.8 विकास

“विकास म्हणजे काळानुसार कुठल्याही गोष्टीत होणारे गुणात्मक, प्रकारात्मक किंवा दर्जात्मक अधिक्य होय.”

1.4.9 कार्यक्रमाची निर्मिती

"एखाद्या घटकाचा/कार्याचा उद्देश/उद्दिष्ट निश्चित झाल्यानंतर त्याची पूर्तता करण्यासाठी वेळ, श्रम, पैसा, मनुष्यबळ, उपलब्ध साधने, सदर घटकांच्या आधारे केलेले नियोजन म्हणजे कार्यक्रमाची निर्मिती होय."

1.4.10 परिणामकारकता

"निरनिराळ्या शैक्षणिक साधनांचा वापर करुन एखाद्या घटकाची योग्यता तपासणे म्हणजे परिणामकारकता होय". – शैक्षणिक मूल्यमापन, चा. प. कदम

1.4.11 एक अभ्यास

"सूक्ष्म व वस्तूनिष्ठ दृष्टिकोणातून केलेला अभ्यास म्हणजे एक अभ्यास होय."

1.5 संशोधनाची उद्दिष्टे :–

1.5.1 इंग्रजी माध्यमाच्या माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांना मराठी भाषेतील विविध भाषिक कौशल्यांची ओळख करुन देणे.

1.5.2 इंग्रजी माध्यमाच्या विद्यार्थ्यांसंदर्भात मराठी भाषेतील भाषिक कौशल्याचा आस्वादाचे महत्त्व अभ्यासणे.

1.5.3 मराठी भाषेच्या आस्वादन कौशल्य विकास घटकांचा शोध घेणे.

1.5.4 मराठी भाषेच्या आस्वादन कौशल्याच्या मापनासाठी पदनिश्चयन श्रेणीचे विकसन करणे.

1.5.5 मराठी भाषेच्या आस्वादन कौशल्य विकास कार्यक्रमाची निर्मिती करणे.

1.5.6 मराठी भाषेच्या आस्वादन कौशल्य विकास कार्यक्रमाच्या निर्मितीची परिणामकारकता अभ्यासणे व उपाययोजना सुचविणे.

1.6 संशोधनाची गृहितके :–

1.6.1 मराठी भाषेत विविध भाषिक कौशल्याचे प्रकार आहेत.

1.6.2 इंग्रजी माध्यमाच्या विद्यार्थ्यांसंदर्भात मराठी भाषेतील विविध भाषिक कौशल्याचा अभ्यास खूप महत्त्वाचा आहे.

1.6.3 मराठी भाषेच्या आस्वादन कौशल्य विकासाच्या घटकांचा शोध घेता येतो.

1.6.4 मराठी भाषेच्या आस्वादन कौशल्य मापनासाठी पदनिश्चयन श्रेणीचे विकसन करता येते.

1.6.5 मराठी भाषेच्या आस्वादन कौशल्य विकास कार्यक्रमाची निर्मिती करता येते व त्याची परिणामकारकता अभ्यासता येते.

1.6.6 मराठी भाषेतील साहित्य आस्वादन कौशल्य विकास कार्यक्रमाची निर्मिती करुन त्याची परिणामकारकता अभ्यासता येते. व त्यावर उपाययोजना सुचविता येतात.

1.7 संशोधनाची व्याप्ती :–

1.7.1 प्रस्तुत संशोधन हे नांदेड जिल्ह्याअंतर्गत येणाऱ्या 16 तालुक्यातील प्रत्येकी 03 याप्रमाणे असे एकूण 48 इंग्रजी माध्यमाच्या माध्यमिक शाळेतील इयत्ता 8, 9 व 10 वीत शिकत असलेल्या 720 विद्यार्थ्यांच्या निवडी पुरतेच व्यापक असणार आहे.

1.7.2 प्रस्तुत संशोधनाचे सर्वेक्षण हे नांदेड जिल्ह्यातील 16 तालुक्याअंतर्गत येणाऱ्या 48 इंग्रजी माध्यमाच्या माध्यमिक शाळेतील इयत्ता 8, 9 व 10 वी मधील 720 विद्यार्थ्यांना मराठी भाषेच्या आस्वादन कौशल्य विकास कार्यक्रमाची निर्मिती व परिणामकारकतेच्या अभ्यासापुरतेच व्यापक असणार आहे.

1.7.3 प्रस्तुत संशोधनाचा कालावधी हा सन 2021–2024 साठीच व्यापक असणार आहे.

1.8 संशोधनाची मर्यादा :–

संशोधकाने निवडलेला संशोधनाचा विषय हा अवघड आहे यात वेळ, काळ, आणि पैसा याची मर्यादा पडते यात प्रमुख मर्यादा खालीलप्रमाणे आहेत.

1.8.1 प्रस्तुत संशोधन हे नांदेड जिल्ह्याअंतर्गत येणाऱ्या 16 तालुक्यातील प्रत्येकी 03 याप्रमाणे असे एकूण 48 इंग्रजी माध्यमाच्या माध्यमिक शाळेतील इयत्ता 8, 9 व 10 वीत शिकत असलेल्या 720 विद्यार्थ्यांच्या निवडी पुरतेच मर्यादित आहे.

1.8.2 प्रस्तुत संशोधनाचे सर्वेक्षण हे नांदेड जिल्ह्यातील 16 तालुक्याअंतर्गत येणाऱ्या 48 इंग्रजी माध्यमाच्या माध्यमिक शाळेतील इयत्ता 8, 9 व 10 वी मधील शिकत असलेल्या 720 विद्यार्थ्यांना मराठी भाषेच्या आस्वादन कौशल्य विकास कार्यक्रमाची निर्मिती व परिणामकारकतेच्या अभ्यासापुरतेच मर्यादित आहे.

1.8.3 प्रस्तुत संशोधनाचा कालावधी हा सन 2021–2024 पुरतेच मर्यादित असणार आहे.

1.9 संशोधन कार्यपध्दती :–

प्रस्तुत संशोधनाच्या अभ्यासासाठी उद्दिष्टांना अनुसरुन संशोधकाने सर्वेक्षण पध्दती व प्रायोगिक पध्दती निवडणार आहे.

1.10 संशोधनाची साधने :–

प्रस्तुत संशोधनामध्ये माहिती संकलनासाठी संशोधकाने संशोधन उद्दिष्टांनुसार नांदेड जिल्ह्यातील इंग्रजी माध्यमाच्या माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांसाठी मराठी भाषेच्या आस्वादन कौशल्य विकास कार्यक्रमाची निर्मिती व परिणामकारकता अभ्यासण्यासाठी निरीक्षण, प्रश्नावली व पदनिश्चयन श्रेणी या तीन साधनांची निवड करणार आहे.

1.11 न्यादर्श निवड :–

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधक सुगम यादृच्छिक नमुना निवड पध्दतीचा वापर करणार आहे. सुगम यादृच्छिक नमुना म्हणजे जनसंख्येतील प्रत्येक घटकास किंवा एककास या पध्दतीत निवडले जाण्याची समान शक्यता असते. म्हणजेच कोणत्याही प्रकारचा पक्षःपात न होता जनसंख्या घटकांच्या न्यादर्शात अंतर्भूत होण्याची समान संधी मिळणे होय.

येथे जनसंख्या म्हणजे नांदेड जिल्ह्याअंतर्गत येणाऱ्या 16 तालुक्यातील प्रत्येकी 03 याप्रमाणे असे एकूण 48 इंग्रजी माध्यमाच्या माध्यमिक शाळेतील इयत्ता 8, 9 व 10 वीत शिकत असलेल्या 720 विद्यार्थ्यांची सर्वेक्षण न्यादर्श म्हणून संशोधक निवड करणार आहे.

1.12 संशोधन अभ्यास वेळापत्रक

अ.क्र.	घटक	वेळ
1	संशोधन प्रस्तावना	2 महिने
2	पुर्व संशोधन आढावा	3 महिने
3	संशोधन पध्दती निवड, नमुना निवड, साधनांची निवड, वैद्यता इत्यादी	3 महिने
4	माहिती संकलन	5 महिने
5	माहिती विश्लेषण आणि अर्थनिर्वचण	2 महिने
6	शिफारशी आणि सूचना	1 महिना
7	सारांश	1 महिना
8	टंकलेखन / प्रिंट / बायडींग	1 महिना
	एकूण	**18 महिने**

1.13 समारोप :—

थोडक्यात, या सारांशात संशोधकाने संशोधन समस्या **"नांदेड जिल्ह्यातील इंग्रजी माध्यमाच्या माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांसाठी मराठी भाषेच्या आस्वादन कौशल्य विकास कार्यक्रमाची निर्मिती व परिणामकारकता—एक अभ्यास"** सदर संशोधन विषयाशी संबंधित प्रस्तावना, संशोधन विषयाची कार्यात्मक व्याख्या, संशोधनाची गरज व महत्त्व, संशोधनाची उद्दिष्टे, गृहितके, संशोधनाची साधने, संशोधनाची व्याप्ती व मर्यादा, न्यादर्श निवड इत्यादी माहिती नमुद करण्यात आलेली आहे.

संशोधक
हिवराळे चंद्रकांत विठ्ठलराव
एम. ए. (मराठी), एम. एड,
एम. फिल. (शिक्षणशास्त्र)

संशोधन मार्गदर्शक
प्राचार्य, डॉ. घुले एस. व्ही.
एम. ए. (इंग्रजी, अर्थशास्त्र), एम. एड.,
(सेट शिक्षणशास्त्र), पीएच. डी.
महात्मा गांधी बी. एड./एम. एड. कॉलेज,
सिडको नविन, नांदेड.